SHELTER
A S S O C I A T E S

१९९३ साली पुण्यामध्ये संवेदनशील आर्किटेक्टस्, प्लॅनर्स यांनी एकत्रित येउन शहरातील गरीब घटकांसाठी मुलभुत सुविधा आणि परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने शेल्टर असोशिएटस ही स्वयंसेवी संस्था स्थापन केली.

संस्थेने महाराष्ट्रातील खुल्दाबाद, ठाणे, पुणे, सोलापुर, सांगली आदी शहरांमधुन पुनर्वसन व शौचालय प्रकल्प यशस्वीपणे राबवले आहेत. लोकसहभाग हे संस्थेच्या कामाचे सुत्र यशाचे गमक आहे यानुसारच "बांधणी" ही वस्तीतील संघटना संस्थेशी संलग्न आहे.

वस्त्यांचे सर्वेक्षण करताना अपुरी आणि विश्वासार्ह माहितीच्या त्रुटीमुळे योग्य नियोजन करता येत नसे, त्यामुळे (GIS) "भौगोलीक अभ्यास पध्द्ती" तंत्रज्ञानाचा वापर अंगीकारला. भारतात हया तंत्रज्ञानाचा वापर करणारी शेल्टर असोशिएटस् ही संस्था पहीली ठरली. सध्या संस्था GIS व Remote Sensing या तंत्रांचा वापर शहर पातळीवर करत आहे. शहरातील एखादया भागाच्या मर्यादीत विकासापेक्षा संपुर्ण शहरातील सर्व वस्त्यांचा शहर पातळीवर विचार करणे योग्य ठरते.

विकासकामात संस्थेने कायमच गरीब घटकाला केंद्रस्थानी ठेवले आहे. संस्थेने सांगलीमध्ये केलेला पहिला प्रकल्प म्हणजे शहराच्या पातळीवर केलेली सर्व वस्त्यांची सविस्तर सुची. २००२ मध्ये सां.मि.कु. म.न.पा. क्षेत्रात संस्थेने प्रायोगिक तत्वावर "सार्वजनिक शौचालय" प्रकल्प दोन वस्तीत राबवला. याच धर्तीवर स्थानिक गरजेनुरसार सार्वजनिक किंवा वैयक्तीक राबवलेल्या शौचालय प्रकल्पाचा लाभ बारा वस्तीतील ३५०० लोकांना झाला. साहजिकच वस्तीतील लोकांच्या संस्थेकडुन अपेक्षा वाढत गेल्या. यातीलच एक अपेक्षा म्हणजे "घरकुल पुर्ती" !

जाने २००९ मध्ये सां.मि.कु महापालीकेने शेल्टर असोशिएटस्ला पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत घरकुल प्रकल्पाचा डी.पी.आर. तयार करण्यासाठी कन्सल्टन्ट म्हणुन नेमले. या प्रकल्पाचा लाभ सांगलीतील ५० टक्के गरीब लोकांना मिळणार आहे. अर्थातच या प्रकल्पात शेल्टर संस्थेने वर नमुद केलेल्या अद्यावत तंत्रज्ञानाचा उपयोग केला. जे.एन.एन.यु.आर कार्यक्रमांतर्गातील हा प्रकल्प केंद्रशासनाने "विषेश प्रकल्प" म्हणुन मान्य केला आहे. प्रकल्पाकडे केंद्रशासन "प्रेरणादायी" प्रकल्प म्हणुन पाहत आहे. २९ वस्तीतील ४००० कुटुंबांचे पुनर्वसन या प्रकल्पांतर्गत होणार आहे.

Head Office - A/17, Sarasnagar Siddhivinayak Society, Shukrawar Peth, Pune - 411 002 Tel. - (020) 24482045/24440363
Email - shelter3associates@gmail.com • info@shelter-associates.org Website - www.shelter-associates.org
Branch Office - Flat No. 12, Adinath Nagar, Amrai, Sangli - 416 416 Tel. No. - 9850567854

Shelter Associates a registered society (Reg. No. 8401/94/Pune and trust Reg. No. F.9162/Pune)

SHELTER
ASSOCIATES

खोलवर अभ्यास आणि सतत संपर्कातुन संस्थेला गरीबांच्या वैयक्तीक आणि सामाजिक गरजांची जाणीव होत आहे. यातुनच घरांचे नकाशे त्यांच्या गरजेप्रमाणे संस्थेने तयार केले. या सर्व प्रकल्पात लाभार्थिंचा सहभाग असणे, संस्थेस महत्वपुर्ण वाटते. सर्वेक्षणानुसार लाभार्थिंची पाळीव जनावरे, व्यवसाय यांचाही समावेश पुनर्वसनात केला जात आहे.

स्वंयपाकासाठी वस्तीतील बहुतांश कुटुंबे जळण वापरतात. गॅस, रॉकेल त्यांना परवडणे शक्य नाही. याचा विचार करुन संस्थेने "धुरविरहीत चुलींचा" शोध घेतला. यातुन संस्थेच्या लक्षात आले की जळण वापरुनसुध्दा शुध्द हवा मिळू शकते. आई आणि मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही चुल फायदेशीर आहे. कुंभार चुलींमुळे श्वसनाचे विकार उद्‌भवतात. (युनायटेड नेशनच्या अहवालानुसार जगातील १.२ मिलीयन मृत्यु घरातील धुराच्या प्रदुषणामुळे होतात). "पर्यावरण आणि आरोग्य रक्षण" या उपक्रमांतर्गत संस्था वस्तीतील महिलांना धुरविरहित चुली उपलब्ध करुन देत आहे. याचाच एक भाग म्हणुन आबा धोत्रे वस्तीत चुल वितरण कार्यक्रम होत आहे. या कार्यक्रमांतर्गत दहा कुटुंबाना चुली उपलब्ध होणार आहेत.

(एस. एस. श्रीखंडे)
सह. कार्यकारी संचालिका
शेल्टर असो. पुणे.